अपर जिल्हाधिकारी संवर्गातील
<u>अधिकाऱ्याची बदलीने पदस्थापनेबाबत..</u>
श्री. राजेंद्र मुठे, अपर जिल्हाधिकारी

महाराष्ट्र शासन
महसूल व वन विभाग
शासन आदेश क्र. बदली-२०२२/प्र.क्र.१९४/ई-१
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
दिनांक :- ०२ नोव्हेंबर, २०२२.

संदर्भ:- १) महाराष्ट्र शासकीय कर्मचाऱ्यांच्या बदल्यांचे विनियमन आणि शासकीय कर्तव्ये पार पाडताना होणाऱ्या विलंबास प्रतिबंध अधिनियम, २००५, दिनांक २५.०५.२००६.
२) शासन आदेश, महसूल व वन विभाग, क्र. पदोन्नती ०१/२०२०/प्र.क्र. १/ई-१, दिनांक ३०.०४.२०२०.
३) शासन अधिसूचना, सामान्य प्रशासन विभाग क्र. एसआरव्ही-२०२०/प्र.क्र.४९/कार्या.१२, दि. १४.०७.२०२१

**शासन आदेश :-**

संदर्भ क्र. २ येथील शासन आदेशान्वये, महाराष्ट्र नागरी सेवा (पदग्रहण अवधी, स्वीएत्तर सेवा आणि निलंबन, बड़तर्फी व सेवेतून काढून टाकणे यांचे काळातील प्रदाने) नियम १९८१ मधील नियम ४० परिशिष्ठ २ अट क्र. १८ नुसार श्री. राजेंद्र मुठे, अपर जिल्हाधिकारी यांना उपायुक्त, पुणे महानगर पालिका, पुणे या पदावर प्रपत्र पदोन्नती देण्यात आली होती.

२. संदर्भ क्र. १ अन्वये, संदर्भ महाराष्ट्र शासकीय कर्मचाऱ्यांच्या बदल्यांचे विनियमन आणि शासकीय कर्तव्ये पार पाडताना होणाऱ्या विलंबास प्रतिबंध अधिनियम, २००५ निर्गमित करण्यात आला आहे.

३. तसेच, संदर्भ क्र. ३ येथील सामान्य प्रशासन विभागाच्या अधिसूचनेमधील नियम क्र.२ (ग)(ग) अनुसार, अतिरिक्त जिल्हाधिकारी व अतिरिक्त जिल्हाधिकारी (निवडश्रेणी) या संवर्गास विभागीय संवर्ग वाटप नियम, २०२१ हे लागू होणार नाहीत, असे स्पष्ट केले आहे.

४. श्री. राजेंद्र मुठे यांची उपायुक्त, पुणे महानगर पालिका, पुणे या पदावरील प्रपत्र पदोन्नतीचा कालावधी संपुष्टात आणण्यात येत असून महाराष्ट्र शासकीय कर्मचाऱ्यांच्या बदल्यांचे विनियमन आणि शासकीय कर्तव्ये पार पाडतांना होणाऱ्या विलंबास प्रतिबंध अधिनियम, २००५ च्या कलम ४(५) मधील तरतुदींनुसार, श्री. मुठे यांच्या नावासमोर स्तंभ क्र. ४ मध्ये दर्शविण्यात आलेल्या पदावर सक्षम प्राधिकाऱ्यांच्या मान्यतेने सार्वजनिक सेवेच्या हितार्थ व प्रशासकीय सोयीच्या दृष्टीने पदस्थापना करण्यात येत आहे.

| क्र. | अधिकाऱ्याचे नाव | सध्याचे पद व कार्यालय | पदस्थापनेचे पद व कार्यालय |
|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) |
| १. | श्री. राजेंद्र मुठे | उपायुक्त, पुणे महानगर पालिका, पुणे | उपायुक्त (करमणुक) विभागीय आयुक्त, पुणे |



Scanned with CamScanner

५. श्री. राजेंद्र मुठे यांना या आदेशानुसार एकतर्फी कार्यमुक्त करण्यात येत आहे. सदरील आदेश तात्काळ अंमलात येत असून श्री. मुठे यांनी पदस्थापनेच्या पदावर तात्काळ रूजू व्हावे.

६. श्री. मुठे यांना कार्यमुक्त करण्याच्या अनुषंगाने नगर विकास विभागाने तसेच आयुक्त, महानगर पालिका, पुणे यांनी स्वतंत्र वा नव्याने आदेश काढण्याची आवश्यकता नाही.

७. श्री. मुठे यांना कळविण्यात येते की, नवीन नियुक्तीच्या जागी रुजू झाल्याबाबतचा अहवाल e१.revenue@maharashtra.gov.in तसेच, chaitali.sawant@nic.in या ई-मेलव्दारे /टपालाव्दारे शासनास त्वरीत कळवावा.

८. उपरोक्त बदली आदेश निर्गमित केल्यानंतर, महाराष्ट्र नागरी सेवा (पदग्रहण अवधी, स्वीयेतर सेवा आणि निलंबन, बडतर्फी व सेवेतून काढून टाकणे यांच्या काळांतील प्रदाने) नियम, १९८१ मधील नियमांनुसार दिलेल्या पदग्रहण अवधीतच, बदली झालेल्या अधिकारी यांनी बदलीच्या ठिकाणी रुजू होण्याची दक्षता घ्यावी. अन्यथा या पदग्रहण अवधीत बदलीच्या पदावर रुजू न झाल्यास, त्यांचा अनुपस्थितीचा कालावधी हा “अकार्यदिन” *(dies non)* म्हणून गणला जाईल, याची संबंधितांनी नोंद घ्यावी.

९. श्री. मुठे यांना शासनाच्या पूर्वपरवानगीशिवाय कोणत्याही कारणास्तव रजा मंजूर करू नये. तसेच, महाराष्ट्र नागरी सेवा (रजा) नियम, १९८१ मधील नियम-३० (सी) नुसार मूळ कार्यालयाने बदली झालेल्या अधिकाऱ्यांचे कोणत्याही प्रकारचे रजेचे अर्ज स्विकारु नयेत. असे अर्ज प्राप्त झाल्यास ते संबंधित अधिकाऱ्यांना मूळ पत्त्यावर नोंदणी पोच देय डाकेने परत करावेत.

१०. सदरहू बदली आदेशानुसार तात्काळ पदस्थापनेच्या पदावर रूजू न झाल्यास वा कोणत्याही प्रकारचा दबाव आणून बदली रद्द करण्याचा प्रयत्न झाल्यास, ही कृती महाराष्ट्र नागरी सेवा (वर्तणूक ) नियम १९७९ मधील नियम २३ चे उल्लघंन करणारी असल्यामूळे, ती गैरवर्तणूक समजून त्यांचे विरुध्द शिस्तभंग विषयक कारवाई करण्यात येईल, याची संबंधितांनी नोंद घ्यावी.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(डॉ. माधव वीर)
शासनाचे सह सचिव

प्रत,

१. मा.मुख्यमंत्री महोदयांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई
२. मा. उप मुख्यमंत्री महोदयांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
३. मा.मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन यांचे सहसचिव, मंत्रालय, मुंबई
४. प्रधान सचिव, नगर विकास विभाग, मंत्रालय मुंबई
५. विभागीय आयुक्त, पुणे विभाग, पुणे.
६. आयुक्त, महानगर पालिका, पुणे
७. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र-१,मुंबई
८. अधिदान लेखा अधिकारी व निवासी लेखा अधिकारी, मुंबई
९. जिल्हा कोषागार अधिकारी, पुणे.
१०. श्री. राजेंद्र मुठे, अपर जिल्हाधिकारी
११. महसूल व वन विभाग कार्यासन ई -१ (अ) ई-२,ई-४ ई-४अ, मंत्रालय, मुंबई

Scanned with CamScanner